# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग)

ACHE/234/SR/AEM/ Dt 23.04.2025

## <u>स्थळ दरपत्रिका सूचना</u>

जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषद २०२५ साठी पश्चिम द्रुतगती महामार्गावरील आग्रीपाडा जवळ, सर्विस रोड, सांताक्रुझ (पूर्व) येथील पदपथाची दुरुस्ती करणेबाबत या कामाकरीता म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांच्याकडून स्थळ दरपत्रिका मागविण्यात येत आहे.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदार यांनी या बाबतचा तपशील, कोटेशन फॉर्म एच/पुर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सर्व अर्जदारांकडून अर्जाचा **नमुना हा अर्ज फी मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पुर्व' विभाग यांच्याकडे भरणा केल्यानंतर उपलब्ध होईल व** इसारा अनामत रक्कम यशस्वी कंत्राटदाराकडून स्वतंत्रपणे भरून घेण्यात येईल.

म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांचे कोटेशन फॉर्म जमा करण्याची मुदत ही दि. 24.04.2025 ते दि. 25.04.2025 रोजी दुपारी 04 वाजेपर्यंत आहे. कोटेशन फॉर्म जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत कंत्राटदारांनी मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले कोटेशन फॉर्म स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 25.04.2025 रोजी दुपारी 04:00 नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक 25.04.2025 रोजी दुपारी 05:00 नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत कंत्राटदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडती करिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत कंत्राटदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत कंत्राटदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता(परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्थळ दरपत्रिका** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त 'एच/पूर्व' विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्थळ दरपत्रिका** स्विकारली जाणार नाही.

**-sd-**

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग**